# भारतात सामाजिक संशोधनाचा विकास एक चिकित्सक अभ्यास

**प्रा. डॉ. प्रतिभा रंगराव बिरादार**, समाजशास्त्र विभाग माऊली महाविद्यालय वडाळा, जिल्हा सोलापूर.
मोबाईल नंबर 9011773670, Email id : Prb.mmw7@gmail.com

---

**प्रस्तावना**

ज्ञान संपादन करणे हे माणसाची मूलभूत प्रवृत्ती आहे. जगातील विविध गोष्टीचे ज्ञान प्राप्त करूनच मानवाने आपले जीवन सुखी व समृद्ध केले आहे प्रत्येक घटनेबाबत असे का त्याची कारणे कोणती असे आपल्या ज्ञानेंद्रचा वापर करून माणसाने अनेक प्रश्नांची उत्तरे शोधली आहे व तो समोर शोधत राहणार आहे याचा अर्थ वस्तुनिष्ठ ज्ञान प्राप्त करणे माणसाचा मूळ उद्देश आहे. त्यासाठी अनुभव वस्तुनिष्ठ कार्यकारण भाव यांचा अंगीकार केला जातो. ज्ञानासाठी शोध या अर्थानेच संशोधन हा शब्द व्यवहारात वापरला जातो. विश्वातील भौतिक गोष्टीचे वैज्ञानिक पद्धतीने ज्ञान प्राप्त केले जाते त्याचप्रमाणे सामाजिक घटकांचा शोध घेण्यासाठी वैज्ञानिक पद्धतीचाच अवलंब केला जातो याचाच अर्थ संशोधनी अत्यंत काळजीपूर्वक आणि टीकात्मक स्वरूपाची चौकशी असून त्याद्वारे काही तथ्य व तत्वे शोधून काढले जातात जे नैसर्गिक व सामाजिक क्षेत्रात सारखेच असते फरक असतो तो दोन शास्त्रातील पद्धतीचा नैसर्गिक शास्त्रात प्रयोगाला महत्त्व असते तर सामाजिक शास्त्रात अनुभव मुलाखत याला महत्त्व असते. संशोधन हा ज्ञानाचा अविभाज्य घटक आहे. संशोधनही एक ज्ञान प्राप्त करण्याची वैज्ञानिक पद्धती आहे. सर्व शाखांचा विकास आणि विस्तार करण्यासाठी संशोधनाची आवश्यकता आहे. वर्तमान काळात ज्ञानात भर टाकने हे संशोधनाचे मूलभूत कार्य आहे. संशोधन अत्यंत काळजीपूर्वक आणि चिकित्सक स्वरूपाची चौकशी असून त्याद्वारे तथ्य आणि तत्वे शोधून काढली जातात. विकसित देशापेक्षा विकसनशील देशांमध्ये सामाजिक संशोधनाची आवश्यकता ही अधिक आहे. आज जगाच्या पाठीवर भारताला विकसनशील राष्ट्र म्हणून ओळखले जाते. भारताच्या विकासाचा वेग लक्षात घेता भारत भारत हा लवकरच विकसित राष्ट्र म्हणून गणला जाईल याच्या पाठीमागच्या महत्त्वाच्या कारणांपैकी एक कारण म्हणजे भारतात वेगवेगळ्या क्षेत्रात झालेले संशोधन होय. या संशोधनाच्या आधारावरच भारताला आपला विकास साधता आल्याचे दिसून येते भारतात नैसर्गिक व सामाजिक क्षेत्रात आजपर्यंत अनेक प्रकारचे संशोधन झालेले दिसून येतात त्यामध्ये नैसर्गिक क्षेत्राचा विचार केला तर जैविक संशोधन रासायनिक संशोधन अन्न वस्त्र संशोधन कृषी संशोधन अंतराळातील संशोधन भूगर्भातील संशोधनाचा विचार करता येईल. त्याचबरोबर सामाजिक क्षेत्राचा विचार करत असताना सामाजिक आर्थिक राजकीय क्षेत्रात झालेल्या संशोधनाचा विचार करता येईल समाजात असलेल्या सामाजिक प्रश्नाच्या बाबतीत झालेल्या संशोधनाचा विचार सामाजिक संशोधनात केला जातो. त्यामध्ये बेरोजगारी दारिद्र्य कुपोषण गुन्हेगारी वाईट प्रथा परंपरा बलात्कार अशा अनेक सामाजिक प्रश्नांच्या बाबतीत भारतात संशोधन झालेले दिसून येते.

- **सामाजिक संशोधनाचा अर्थ -**

सामाजिक संशोधन ही संज्ञा समाज व संशोधन या दोन क्षेत्राशी निगडित आहे. इंग्रजी भाषेत संशोधनाला Research असे म्हणतात याचा अर्थ पुन्हा पुन्हा शोध घेणे असा होतो. बुद्धीनिष्ठ आणि व्यावहारिक प्रश्नांची आणि समस्यांची शास्त्रीय पद्धतीद्वारे समाधानकारक उत्तरे शोधून काढण्याचा संशोधन हा पद्धतशीर प्रयत्न असतो.पॉलिन यंग यांच्यामते 'क्रमबद्धता अंतर्गत संबंध सामान्य स्पष्टीकरण आणि नैसर्गिक नियम यांच्याद्वारे नवीन तथ्य शोधून काढण्याची किंवा जुन्या तथ्यांची पडताळणी होण्याची सामाजिक संशोधन ही एक पद्धतशीर प्रक्रिया आहे'.

सामाजिक शास्त्रात संशोधन हे वैज्ञानिक प्रक्रिया असून या प्रक्रियेद्वारे सामाजिक जीवनासंबंधी नवीन तथ्यांचा शोध घेतला जातो व जुन्यात त्याचे पुनर स्पष्टीकरण केले जाते.

- **संशोधनाचा उद्देश -**

संशोधनाचा उद्देश पुढील प्रमाणे सांगता येईल.

१. संबंधित साहित्याचा आढावा घेणे.

२. भारताच्या विकासात सामाजिक संशोधन कार्याचा आढावा घेणे.

३. सामाजिक संशोधनाचा अर्थ व महत्त्व स्पष्ट करणे .

४. मिळालेल्या तथ्यांच्या आधरे निष्कर्ष मांडणे.

- **भारतात सामाजिक संशोधनाचा विकास**

भारतीय समाजाच्या विकासात सामाजिक संशोधनाच्या महत्त्वाचा आढावा घेत असताना आपणास दोन कालखंडात झालेल्या संशोधनाचा विचार करावा लागतो त्यामध्ये पहिला कालखंड स्वातंत्र्याच्या पूर्वीचा कालखंड व दुसरा म्हणजे स्वातंत्र्योत्तर कालखंड होय.

- **स्वातंत्र्य पूर्वीचा कालखंड (ब्रिटिश कालखंड)**

स्वातंत्र्य पूर्वीच्या कालखंडात झालेल्या सामाजिक संशोधनात ब्रिटिश काळातील संशोधनाचा विचार करावा लागतो. ब्रिटिशांनी भारतात जवळपास दीडशे वर्षे राज्य केले. भारतात ब्रिटिश कालखंडातील झालेल्या संशोधनाला संशोधनापेक्षा सर्वेक्षण म्हणता येईल .भारतात त्या काळात अनेक प्रकारच्या समस्या बाबत संशोधन झालेले दिसून येते. या समस्येचा संबंध राजकीय आर्थिक आणि इतर आवश्यक धोरणांशी होता. या धोरणांच्या निर्धारणा करण्यासाठी सामाजिक जीवनासंबंधी विविध प्रकारच्या सूचनांची आवश्यकता होती. त्यासाठी वेगवेगळ्या आयोगाची नियुक्ती करण्यात आली. या आयोगाने त्या काळात सर्वेक्षण पद्धतीचा वापर करून दुष्काळ, मजुरांची परिस्थिती, आरोग्य, शिक्षण, ग्रामीण भागातील समस्या इत्यादी संबंधित अध्ययन करून आपला अहवाल प्रस्तुत केला. या समस्यांची सांख्यिकी माहिती मिळवण्यासाठी 1870 मध्ये केंद्रीय सचिवालय सुरू करण्यात आले. त्याचबरोबर 1891 मध्ये पहिली जनगणना घेण्यात आले आणि प्रत्येक दहा वर्षांनी जनगणना घेण्यात येऊ लागले. त्यातून लोकसंख्या, आर्थिक ,शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक जीवनातील विविध पैलू व समस्या विषय महत्त्वपूर्ण माहिती मिळू लागली.

ब्रिटिश काळातील समाजशास्त्रज्ञाने अर्थशास्त्रज्ञाने मानवश्य शास्त्रज्ञाने राज्यशास्त्रज्ञाने केलेले संशोधन महत्वाचे ठरते त्यामध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी अर्थनीती संदर्भ द प्रॉब्लेम ऑफ रुपीस आणि अस्पृश्यता विषय हो वेअर द शुद्राज केलेले संशोधन महत्वाचे मानले जाते दादाभाई नौरोजी त्या काळात ब्रिटिश हे भारतातील लोकांचे दुहेरी पिळूण करतात याबाबतीत त्यांनी संशोधन करून आर्थिक निसारणाचा सिद्धांत मांडला त्याचबरोबर मानवश्य शास्त्रज्ञाने भारतीय जमातीच्या संबंधात काही महत्त्वपूर्ण संशोधन केले आहे या अध्ययना मधून सामाजिक संशोधनाची तंत्रे व व्यक्तिगत जीवन पद्धत अध्ययन पद्धती मध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा आणि पर्याप्त मानव विकास झालेला दिसून येतो त्यामध्ये सर रिजलो यांचे ' The Todas - १९०६, एस. सी. रॉय यांचे The mundas and their country १९१२, जे. एस. मिल्स यांचे The Rengama Nega १९२६, इंद्रजीत सिंह यांचे, Gondwana ans the गोंडस १९४४, इ चां समावेश होतो.पण ब्रिटिश काळात झालेले संशोधन हे म्हणावे तितके विकसित नव्हते. ब्रिटिश काळातील काही संशोधन कार्याची विशेषता म्हणजे शोध कार्याचा उद्देश राजकीय स्वार्थाची पूर्ती करणे होता त्यामुळे केवळ अशाच तथ्यांना एकत्रित करण्याचा प्रयत्न करण्यात आला जो ब्रिटिश शासनाच्या हिताचा होता म्हणून त्या काळातील झालेल्या संशोधनातून भारतीय समाजाचा मनावा तितका विकास होऊ शकला नाही.

- **स्वातंत्र्योत्तर कालखंड**

15 ऑगस्ट 1947 रोजी भारत इंग्रज राजवटीतून मुक्त झाला. आणि भारताने लोकशाही शासन व्यवस्थेचा स्वीकार केला. आणि कल्याणकारी राज्य निर्माण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येऊ लागले. शासनाला कल्याणकारी समाज व्यवस्था निर्माण करत असताना अनेक प्रश्नांना तोंड द्यावे लागले. त्यामध्ये आरोग्य, स्त्री विकास, ग्राम विकास, शिक्षण ,दारिद्र्य, बेरोजगारी इत्यादी शासनाला याबाबतीत योग्य निर्णय घेण्यासाठी सामाजिक संशोधनाचा आधार घ्यावा लागलेला दिसून येतो. सामाजिक संशोधनाच्या माध्यमातून वरील प्रश्नाचा योग्य प्रकारे अभ्यास करण्यात आला. आणि त्यातून शासनाला योग्य अशी दिशा मिळाली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विविध विद्यापीठातून सामाजिक संशोधन कार्यास प्रारंभ झाला योजना आयोग, भारतीय कृषी संस्था, भारतीय सामुदायिक विकास संस्था, नॅशनल सॅम्पल सर्वे निर्देशालय इत्यादी संस्थेच्या माध्यमातून संशोधन कार्यास सुरुवात झाले. 1953 मध्ये भारतीय नियोजन मंडळाच्या अधिपत्याखाली संशोधन कार्यक्रम समिती स्थापन करण्यात आली. 1969 मध्ये या समितीचे रूपांतर 'इंडिया कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्चमध्ये' करण्यात आले. भारतीय सामाजिक संशोधनात या संस्थेचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. त्याचप्रमाणे 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस मुंबई ,दिल्ली स्कूल ऑफ सोशल वर्क , इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक ऑपिनियन दिल्ली, या संस्थेची ही सामाजिक संशोधनात महत्त्वपूर्ण योगदान आहे. याशिवाय बिहार, आंध्र प्रदेश, गुजरात मध्य प्रदेश ओरिसा राजस्थान आणि पश्चिम बंगाल या राज्यात आदिवासी संशोधन संस्था स्थापन करण्यात आल्या. विविध योजना व उपक्रमांच्या माध्यमातून सामाजिक संशोधनाला चालना मिळत आहे. भारतीय समाजाचा आदिवासी समुदाय एक घटक असल्यामुळे अशा आदिवासी भागांचा अभ्यास करण्यासाठी त्यांना प्रवाहात आणण्यासाठी त्या त्या आदिवासी भागात आदिवासी संशोधन संस्था उभारण्यात आल्या. ही संस्था आदिवासी जीवनाचा अभ्यास करत असून त्यांच्या समस्येवर प्रकाश टाकण्याचे कार्य करत आहेत व त्याच्या योग्य प्रकारच्या उपाययोजनाचा, सूचनेचे कार्य संशोधनाच्या माध्यमातून करत असताना दिसून येतात. त्यामुळे आज काही प्रमाणात आदिवासी समुदाचा विकास साधता आल्याचे दिसून येते.

विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे दरवर्षी संशोधन कार्यासाठी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते या शासकीय संस्था व्यतिरिक्त विद्यापीठ आणि इतर स्वतंत्र संशोधन केंद्र द्वारे देखील अनेक महत्त्वपूर्ण संशोधन कार्य करण्यात आले आणि आता देखील केले जात आहे त्याचप्रमाणे व्यक्तिगत आधारावर सामाजिक संशोधन कार्य करण्यामध्ये डॉ.जी एस घुर्ये डॉ.एम एन श्रीनिवास, डॉ. एस सी दुबे, डॉ.आय.पी. देसाई, डॉ.इरावती कर्वे इत्यादी समाजशास्त्रज्ञ आणि मानवशास्त्रज्ञांचे विशेष योगदान आहेत.

- **भारतासारख्या विकसनशील देशात सामाजिक संशोधनाची आवश्यकता-**

विकसित देशाच्या तुलनेत विकसनशील देशात सामाजिक संशोधनाची आवश्यकता ही अधिक असते भारत हा विकसनशील देश आहे आज देखील आपल्या देशात अनेक सामाजिक आर्थिक राजकीय समस्या आहेत त्यामुळे भारताच्या विकासाची गतिबंध आहे म्हणून सामाजिक संशोधनाचा विकास करणे आवश्यक आहे भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये सामाजिक संशोधनाची किती आवश्यकता आहे हे पुढील मुद्द्याच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**१. अज्ञानाचा नाश करणे -**

भारताला स्वातंत्र्य मिळून 75 वर्षे पूर्ण झाले तरी आपल्या देशातील लोकांचे अज्ञान कमी झालेले दिसून येत नाही. भारतात शिक्षणाचे प्रमाण कमी असल्यामुळे अज्ञानाचे प्रमाण हे अधिक असल्याचे दिसून येते. भारतीय लोकांवर रुढी, प्रथा, परंपरेचा फार मोठ्या प्रमाणामध्ये प्रभाव आहे. जातिवाद, प्रांतवाद, भाषावाद इत्यादी वादा निर्माण झाल्या असून त्यातून संघर्षाची परिस्थिती निर्माण होत आहे. आणि हे राष्ट्रीय

एकात्मतेला धोका निर्माण करते अज्ञान दूर करण्यासाठी भारतामध्ये सामाजिक संशोधनाची अधिक आवश्यकता आहे.

**२. अंधविश्वासाचा नाश करणे-**

आपण 21 व्या शतकामध्ये विज्ञानाचे युगामध्ये वावरत असताना आपल्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विकास होणे गरजेचे आहे. परंतु आपल्या भारत देशात मात्र वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव असल्याचे दिसून येते. अज्ञान अंधश्रद्धा प्रथापरंपरेचा प्रभाव आजही भारतीय लोकांवर मोठ्या प्रमाणात असलेला दिसून येतो. सामाजिक संशोधनाच्या माध्यमातून व्यक्तींमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**३. सामाजिक समस्या दूर करण्यासाठी-**

देशामध्ये बेरोजगारी ,दारिद्र्य, गुन्हेगारी, मादक पदार्थांची समस्या , जाती संघर्ष ,भाषावाद, प्रांतवाद विविध समस्या आहेत. सर्वच देशात अशा विविध समस्या असल्या तरी प्रत्येक देशातील परिस्थितीनुसार त्याची कारणे व परिणाम भिन्न भिन्न असतात. त्या कारणाचे मूळ त्या त्या देशातील आर्थिक ,सामाजिक, राजकीय परिस्थितीत असते. इतर देशातील समाजापेक्षा भारतीय समाजाचे स्वरूप हे वेगळे आहे. त्यासाठी विशेष आणि वेगळ्या प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

4. **सामाजिक परिवर्तनाची दिशा जाण्यासाठी-**

विकसनशील देशात सामाजिक परिवर्तन हे जलद गतीने घडून येते हे परिवर्तन कोणत्या दिशेने होते याचे ज्ञान जोपर्यंत होत नाही तोपर्यंत सामाजिक प्रगतीची दिशा कोणती असावी हे सांगणे अशक्य आहे आपला भारत संक्रमण अवस्थेत आहे एकीकडे जुन्या परंपरां कालबाह्य ठरलेल्या आहेत. त्यामुळे त्या नष्ट करणे आवश्यक आहे तर दुसरीकडे बदलल्या परिस्थितीत नवीन विचार, नवीन मुल्ये, नवीन संस्था निर्माण होत आहे. भारतीय समाजात शीघ्र गतीने परिवर्तन होत आहे. परंतु त्या परिवर्तनाला योग्य दिशा देणे आवश्यक आहे.

५. **प्रभावी सामाजिक नियंत्रण-**

विकसनशील देशात सामाजिक नियंत्रणाची समस्या निर्माण होते. बदलत्या परिस्थितीत पूर्वीचे सामाजिक नियंत्रणाची साधने कालबाह्य ठरतात. म्हणून सामाजिक नियंत्रणाचे नवीन साधने निर्माण होणे आवश्यक असते. आज परंपरागत साधना ऐवजी कायदे, न्यायालय, पोलीस व्यवस्था इत्यादी नवीन साधने अस्तित्वात आलेत. या साधनाचा प्रभाव सामाजिक नियंत्रणासाठी कसा उपयोग करता येईल हे फार मोठी समस्या आहे. त्यासाठी प्रभावी सामाजिक नियंत्रणाकरिता संशोधनाच्या माध्यमातून ज्ञान मिळवणे आवश्यक आहे.

६. **योजनांच्या यशस्वीतेसाठी-**

भारतीय समाजाचे योग्य विकास व्हावा म्हणून शासनाने निरनिराळे योजना राबविणे सुरू केले आहे. परंतु जोपर्यंत लोकांचा पाठिंबा मिळत आणि सहकार्य मिळत नाही. तोपर्यंत या योजना यशस्वी होऊ शकणार नाही. शासनाच्या योजना लोकांपर्यंत पोहोचत नाही. या योजना केवळ सरकारी आहेत. आपल्या त्यांच्याशी कोणत्याही संबंध नाही असे लोकांना वाटते त्यामुळे शासकीय योजनेस लोकांचे सहकार्य मिळत नाही. शासकीय योजना अयशस्वी का ठरतात या प्रश्नाच्या संदर्भात संशोधन करून वस्तुनिष्ठ ज्ञान मिळवणे गरजेचे आहे.

**७. राष्ट्रीय एकता निर्माण करण्यासाठी-**

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. अनेक जाती, धर्म, वंश, पंथांचे लोक देशात राहतात. त्यामुळे लोकांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेचा अभाव आढळतो. विविधतेमुळे त्यांच्या संघर्ष निर्माण होतात. आपल्या देशात राष्ट्रीय एकात्मतेची समस्या निर्माण झाली आहे. सामाजिक एकात्मतेमध्ये अडथळे निर्माण करणाऱ्या

घटकांचे संशोधन करून हे अडथळे दूर करण्यासाठी उपाय योजना सुचविणे गरजेचे आहे. वैज्ञानिक दृष्टिकोनाचा आधार घेऊन संशोधन करणे गरजेचे आहे.

**• निष्कर्ष**

वरील तथ्यांच्या माध्यमातून निघालेली निष्कर्ष हे पुढील प्रमाणे.

१. ब्रिटिश काळातील संशोधन हे दुष्काळ, मजूर, कृती शिक्षण इत्यादी गोष्टीशी प्रामुख्याने संबंधित होते.

२. त्या काळात सामाजिक संशोधनाची पद्धती व तांत्रिक साधने अत्यंत अविकसित होते. शासनाला त्याचा विकास करण्याची आवश्यकता भासली नाही. त्यामुळे जे काही तथ्य एकत्रित करण्यात आले ते कमी शिकलेल्या आणि अप्रशिक्षित लहान मोठ्या सरकारी कर्मचाऱ्यांच्या सूचनांच्या आधारावर प्राप्त करण्यात आले. ग्रामीण पातळीवर या संदर्भातील माहिती अतिशय दयनीय होती. कारण तेथे चौकीदार, गावप्रमुख, पोलीस आणि पटवारी इत्यादी लोकांनी जे काही उलट सुलट माहिती दिली तीच माहिती संशोधनाचा आधार बनली.

३. ब्रिटिश काळातील संशोधन कार्याची एक उल्लेखनीय विशेषता म्हणजे शोध कार्याचा उद्देश राजकीय स्वार्थाची पूर्ती करणे हा होता. त्यामुळे केवळ अशाच तथ्यांना एकत्रित करण्याचा प्रयत्न करण्यात आला. जो ब्रिटिश शासनाच्या हिताचा होता. म्हणून त्या काळात आलेल्या संशोधन कार्यातून भारतीय जनजीवनातील व्याप्त विभिन्न सामाजिक समस्यांची वास्तविकता स्पष्ट होत नाही.

४. ब्रिटिश कारखाना मध्ये संशोधन कार्याचा आधार काही सांख्यिकी आकडे होते कारण संशोधनाच्या इतर तंत्राचा विकास झालेला नव्हता.

५. ब्रिटिश कालखंडामध्ये मानस शास्त्रज्ञाने दिलेले योगदान अतिशय उल्लेखनीय आहे परंतु त्यांचे हे अध्ययन प्रामुख्याने भारतीय आदिवासी आणि मागासलेल्या जातीपुरतेच मर्यादित होते.

६. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संशोधनाला महाविद्यालयीन पातळीपासून प्रोत्साहन मिळालेले दिसून येते. संशोधनासाठी विविध संस्थेची स्थापना करून संशोधनाला चालना दिली जात आहे.

७. बदलत्या काळानुसार नवी सिद्धांताची मांडणी आवश्यक आहे त्यासाठी संशोधन हे गुणात्मक स्वरूपाचे वस्तुनिष्ठ कसे बनेल याकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे.

८. सिद्धांताची निर्मिती व संशोधनाची प्रगती एकमेकांच्या सहकार्यावर अवलंबून आहे त्यामुळे दोघांच्या सहकारातून सिद्धांत व संशोधन यांचा विकास होतो.

९. स्वातंत्र्यपूर्व स्वातंत्र्यानंतर भारतात सातत्याने सामाजिक संशोधन होत आहे. शासकीय निम शासकीय, महाविद्यालयीन, विद्यापीठ स्तरावर संशोधन होत आहे. महाविद्यालयीन व विद्यापीठ स्तरावर होणाऱ्या संशोधनात संशोधनाची संख्यात्मक वाढ होत आहे परंतु गुणात्मक दर्जा दिसून येत नाही.

**• संदर्भ ग्रंथ सूची-**

१. समाजशास्त्रीय संशोधन - घाटोळे रा. ना. श्री मंगेश प्रकाशन नागपूर 2009.
२. संशोधन पद्धती - ढगे एस.के. आणि हासे सि.पी. के.एस.प्रकाशन पुणे 2011
३. सामाजिक संशोधन पद्धती - कराडे बी. एम. पिंपळापुरे अँड कं.पब्लिशर्स नागपूर 2009
४. समाजशास्त्र संकल्पना आणि सिद्धांत - प्रदीप आगलावे, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर 2009
५. संशोधन पद्धती - डॉ.वा.भा. पाटील प्रशांत पब्लिकेशन जळगाव 2012
६. समाजशास्त्रातील सैद्धांतिक दृष्टिकोन - प्रा.पी.के .कुलकर्णी मंगेश प्रकाशन नागपूर